**प्रेसनोट** दि. २९/०६/२०२४

**लोकसेवक दादाभाऊ सोनू तळपे, पद - तत्कालीन उपसंचालक, भुमी अभिलेख, नागपूर (सध्या - सेवानिवृत्त) व त्यांची पत्नी यांचेविरुद्ध ज्ञात उत्पनापेक्षा जास्त मालमत्ता बाळगले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ४१६/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम १३(१)(इ), १३(२), सह भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, (सुधारीत अधिनियम सन २०१८) चे कलम १३(१)(ब), १३ (२) सह भा.दं.वि. कलम १०९. |
| तक्रारदार / फिर्यादी | श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) दादाभाऊ सोनू तळपे, वय ६२ वर्ष, तत्कालिन उपसंचालक, भुमी अभिलेख, नागपूर. (सध्या - सेवानिवृत्त) (वर्ग-१)<br>२) सौ. कल्पना दादाभाऊ तळपे, वय ५८ वर्ष, व्यवसाय – गृहीणी, दोघे रा. हरमस हेरिटेज - ११, येरवडा, पुणे. (पत्नी) |
| परिक्षण कालावधी | दि. २१/०२/१९८१ ते दि. ३१/०३/२०१४ |
| अपसंपदा निष्पन्न रक्कम | २८,५२,५४१/- रुपये (ज्ञात उत्पन्नापेक्षा १८.७४ % जास्त) |

गुन्हा दाखल दिनांक :- २९/०६/२०२४ रोजी.

थोडक्यात माहिती :- यातील आरोपी लोकसेवक दादाभाऊ तळपे यांनी संपादित केलेल्या मालमत्तेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयाकडून उघड चौकशी करण्यात आली होती. लोकसेवक दादाभाऊ तळपे यांनी संपादित केलेल्या मालमत्ता कायदेशीर स्त्रोताद्वारे संपादित केली किंवा कसे ? याबाबत त्यांना वेळोवळी संधी देवून माहिती घेण्यात आली होती. परंतू त्यांनी संपादित केलेल्या मालमत्तेबाबत ते पुष्टीदायक पुरावे सादर करु शकले नाहीत. त्यांनी लोकसेवक पद धारण केलेल्या कालावधीत त्यांना प्राप्त असलेल्या कायदेशीर उत्पन्नापेक्षा स्वतःचे तसेच पत्नी सौ. कल्पना तळपे यांचे नावे रक्कम रुपये २८,५२,५४१/- (ज्ञात उत्पन्नापेक्षा १८.७४ % जास्त) किमतीची अपसंपदा भ्रष्ट मार्गाने संपादित केल्याचे उघड चौकशीअंती निष्पन्न झाले आहे.

सदरहु विसंगत बेहिशोबी मालमत्ता संपादित करण्यासाठी लोकसेवक श्री. दादाभाऊ सोनू तळपे यांना त्यांची पत्नी सौ. कल्पना दादाभाऊ तळपे यांनी सहाय्य करुन गुन्ह्यास प्रोत्साहित करुन, अपप्रेरणा दिली. म्हणुन लोकसेवक दादाभाऊ तळपे (सध्या - सेवानिवृत्त) व त्यांची पत्नी सौ. कल्पना तळपे यांचेविरुध्द येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरीलप्रमाणे उघड चौकशींअंती अपसंपदेचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री. श्रीराम शिंदे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

कोणताही लोकसेवक, शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी अपसंपदा संपादित केल्याबाबत खात्रीलायक माहिती असल्यास तसेच लोकसेवक, शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.